**सोलापूर महानगरपालिका**

संदर्भ :- जा.क्र.आआ/एन.यु.एच.एम./३५५ दि.१७/०२/२०२० चे जाहिर प्रसिध्दीकरण

जा.क्र.आअ/एन.यु.एच.एम./३६७
आरोग्य अधिकारी कार्यालय
दि.२८/०२/२०२०

## -: शुध्दीपत्रक :-

उपरोक्त संदर्भीय जाहिर प्रसिध्दीकरणाव्दारे सोलापूर महानगरपालिकेच्या राष्ट्रीय आरोग्य अभियान अंतर्गत विविध पदाकरीता अर्ज मागविणेत आलेले होते. सदर संदर्भीय जाहिरप्रसिध्दीकरणामध्ये खालील प्रमाणे दुरुस्ती करणेत येत आहे.

१) सर्व पदाकरीता अर्ज स्विकृतीच्या तारखेमध्ये मुदतवाढ देण्यात येऊन, दिनांक ११/०३/२०२० पर्यंत अर्ज स्विकारण्यात येतील.

२) खुल्या प्रवर्गाकरीता र.रु.२००/- चा धनाकर्ष (डिमांड ड्राफ्ट) आयुक्त,सोलापूर महानगरपालिका या नांवे जाडावे.

३) संदर्भीय जाहिर प्रसिध्दीकरणामध्ये लेखी परिक्षा व मुलाखत घेण्यात येईल असे नमूद केले आहे. त्याऐवजी केवळ मुलाखत घेण्यात येईल अशी दुरुस्ती करणेत येत आहे.

४) पात्र उमेदवारांची प्रारुप यादी दि.१६/०३/२०२० रोजी www.solapurcorporation.gov.in या मनपा संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल.दि.१७/०३/२०२० रोजी सायंकाळी ६.१५ पर्यंत प्रारुप यादीवरील हरकती स्विकारण्यात येतील. पात्र उमेदवारांची अंतिम यादी तसेच शासन निकषानुसार मुलाखतीस पात्र असलेल्या उमेदवारांची यादी (कटऑफ लिस्ट) दि.१८/०३/२०२० रोजी मनपा संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येईल. मुलाखतीच्या तारखा त्याच दिवशी मनपा संकेतस्थळावर प्रसिध्द करणेत येतील.

५) संदर्भीय प्रसिध्दीकरणास अनुसरुन यापुर्वी सादर केलेल्या अर्जदार/उमेदवारांनी पुन:श्च अर्ज करण्याची आवश्यकता नाही.

६) ज्या उमेदवारांनी यापुर्वी खुल्या प्रवर्गामधून अर्ज सादर केलेला आहे व त्यासोबत र.रु.१००/- डि. डि. जोडलेला आहे अशा उमेदवारांनी उर्वरित रु.१००/- चा डिमांड ड्राफ्ट दि.११/०३/२०२० पर्यंत सामान्य प्रशासन विभागाकडे जमा करावा.

७) उर्वरित शर्ती व अटी संदर्भीय जाहिर प्रसिध्दीकरणानुसार राहतील.

(दिपक तावरे,भा.प्र.से.)
आयुक्त
सोलापूर महानगरपालिका